जळगाव : खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (स्वायत्त), स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स यांच्या वतीने २७ व २८ फेब्रुवारी २०२६ रोजी “२७ वे आयटी फेस्टा – २०२६” या राष्ट्रीय स्तरावरील आयटी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा विकास, सर्जनशीलता, संघभावना तसेच सर्वांगीण व्यावसायिक प्रगती साधणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. देशभरातील विद्यार्थ्यांना एक समान व्यासपीठ उपलब्ध करून देत परस्पर सहकार्य, नवकल्पनांची देवाणघेवाण आणि सादरीकरण कौशल्यांना वाव देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

या आयटी फेस्टामध्ये सॉफ्टवेअर प्रदर्शन, C++ प्रोग्रामिंग स्पर्धा, पोस्टर सादरीकरण आणि आयटी क्विझ अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, नव्या तंत्रज्ञानाची ओळख आणि ज्ञानवृद्धीची संधी मिळणार आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या आयटी महोत्सवात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.